
पीकपाणी

# ढोबळी मिरचीची लागवड ठरेल फायदेशीर

**दर्शना मोरे**
(मो.नं.९६८९२१७७९०)
**पल्लवी घुले**
(मो.नं. ९१७२०६५५५५)
सहायक प्राध्यापिका,
क.का. वाघ. उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक





महाराष्ट्रात पुणे, नाशिक, सातारा या जिल्ह्यांमध्ये हिवाळी हंगामात ढोबळी मिरचीची लागवड केली जाते. महाराष्ट्रात ढोबळी मिरची पक्व झालेली असली तरी रंग हिरवागार राहात असल्याने तिचा भाजीशिवाय इतरही उपयोग होतो. ढोबळ्या मिरचीच्या चवीमधील फरक हा मुख्यत्वे करून फळामधील कॅप्सिनच्या प्रमाणावर अवलंबून असतो. हे प्रमाण साधारणतः २ ते ४ टक्केपर्यंत असते. शेतकऱ्यांना लाभदायक ठरणाऱ्या या पिकाविषयी...

**ढो**बळी मिरचीला दिवसाचे सरासरी तापमान २५ सेल्सिअस व रात्रीचे १४ सेल्सिअस उत्तम असून तापमान १० सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास व ठिपके पडल्यास या पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

**जमीन व हंगाम** : ढोबळ्या मिरचीची लागवड ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात करतात. त्यामुळे फळांची काढणी जानेवारी, फेब्रुवारी या कालावधीत करता येते. ढोबळी मिरचीला जमीन चांगली कसदार व सुपीक लागते. मध्यम ते भारी काळी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन या पिकास योग्य आहे. नदीकाठच्या पोयट्याच्या सुपीक जमिनी लागवडीस योग्य आहेत. जमिनीचा सामू ६ ते ७ च्या दरम्यान असावा.

**पूर्वमशागत** : ढोबळ्या मिरचीची लागवड रोपे लावून करतात. यासाठी एक किंवा दोन आर क्षेत्रावर रोपवाटिका करावी. जमीन चांगली उभी आडवी नांगरून हेक्टरी १५ ते २० टन शेणखत घालावे. पूर्वीच्या पिकांची धसकटे गोळा करून दोन कुळवाच्या पाळ्या द्याव्या.

विविध वाण असे आहेत :

**कॅलिफोर्निया वंडर** : या जातीचे झाड मध्यम उंचीचे उभट वाढणारे असून मिरची गर्द हिरव्या रंगाची असते. या मिरचीची साल जाड असून फळांना तिखटपणा नसतो. ही उशिरा तयार होणारी जात असून हेक्टरी उत्पादन १२ ते १५ टन मिळते.

**अर्का मोहिनी** : या जातीची फळे मोठी आणि हिरव्या गडद रंगाची असून फळाचे सरासरी वजन ८० ते १०० ग्रॅम असते. या जातीचे हेक्टरी उत्पादन २० ते २५ टन असते.

या जाती यलो वंडर, भारत आणि इंद्रा यासारख्याच ढोबळ्या मिरचीच्या संकरित जाती लागवडीस योग्य आहेत.

**बियाण्याचे प्रमाण** : दरहेक्टरी ३ किलो बियाणे लागते. एक किलो बियाण्यास पेरणी करण्यापूर्वी २ ग्रॅम थायरम चोळावे.

**लागवड** : रोपे तयार करण्यास निवडलेली रोपवाटिकेची जागा चांगली नांगरून कुळवून तयार करावी. त्यानंतर तीन मीटर लागवडीसाठी लांब १ मीटर रूंद व १५ सें.मी. उंचीचे गादी वाफे तयार करून वाफ्यावर चांगले कुजलेले शेणखत घालावे. वाफ्यांच्या रुंदीला समांतर अशा २ सें.मी. खोलीच्या रेघा ओढून त्यात फोरेट १० जी हे कीटकनाशक १० ग्रॅम प्रत्येक वाफ्यात टाकून बी पेरावे व ते मातीने झाकून टाकावे व बियाण्यांची चांगली उगवण व्हावी म्हणून वाफ्यांना झारीने हलकेसे पाणी द्यावे. बी ६ ते ८ आठवड्याने लागवडीस तयार होते.

पुनर्लागवड करण्यासाठी ६० सें.मी. अंतराने सऱ्या काढाव्यात. रोपे सरीच्या ८ दोन्ही बाजूस सरीच्या बगलेत ३० सें.मी. अंतरावर एका ठिकाणी एक रोप लावून करावे. पुनर्लागवड शक्य तो दुपारी ४.०० नंतर करावी व रोपांना लगेच पाणी द्यावे.

### खते व पाणी व्यवस्थापन

हेक्टरी १५ ते २० टन शेणखताव्यतिरिक्त १५० किलो नत्र १५० किलो स्फुरद व २०० किलो पालाशची आवश्यकता असते. पैकी पालाश व स्फुरद यांचा पूर्ण हप्ता व नत्राचा अर्धा हप्ता लागवडीच्या वेळी द्यावा. उरलेला नत्राचा हप्ता लागवडीनंतर एक महिन्याने व दुसरा हप्ता ५० दिवसांनी द्यावा.

ढोबळी मिरचीला लागवडीपासून सुरुवातीच्या वाढीसाठी भरपूर व नियमित पाण्याची आवश्यकता असते. फुले व फळे लागताना नियमित पाणी द्यावे. सर्वसाधारपणे एक आठवड्याच्या अंतराने पाणी द्यावे.

**आंतरमशागत** : ढोबळी मिरची चुरडामुरडा या रोगास बळी पडत असते. त्यासाठी मिरचीचा मळा नेहमी स्वच्छ असणे आवश्यक असते. त्यासाठी सुरुवातीच्या काळात जरूरीप्रमाणे दोन-तीन वेळा निंदणी करावी. तसेच झाडांना मातीचा भक्कम आधार द्यावा.

### रोग व किडी

**मर** : या रोगामध्ये शेंड्याखालील भाग वाळत जातो. हा रोग फायटोप्थोरा या अळिंबीच्या प्रकारामुळे होतो.

**उपाय** : रोगग्रस्त झाडे समूळ नष्ट करावीत व राहिलेल्या झाडांच्या मुळांजवळ ०.६ टक्के तीव्रतेने बोर्डो मिश्रण ओतावे.

**बोकड्या** : हा व्हायरस रोग असून या विषाणूंचा प्रसार माव्याच्या किडीमार्फत रोगट झाडापासून चांगल्या झाडाकडे होत असतो. या रोगामुळे पाने आखडून झाडांची वाढ खुंटते. झाडांना फुले येत नाहीत व उत्पन्नावर विपरित परिणाम होतो.

**उपाय** : रोगग्रस्त झाडे समूळ उपटून नष्ट करावीत. १ किलो मोनोक्रोटोफॉस प्रतिलिटर पाण्यात या प्रमाणात घेऊन झाडांवर दर १५ दिवसांच्या अंतराने नेहमी फवारणी करावी.

**काढणी व उत्पादन** : फळे हिरवीगार व संपूर्ण वाळलेली असल्यास फळांची काढणी करावी. त्यासाठी फळांच्या टोकांच्या वाळलेल्या स्त्री केसरांचा भाग गळून पडलेला असावा. फळे झाडावर जास्त काळ ठेवल्यास ती पिकतात. काही देशात लाल फळांना जास्त मागणी असते. परंतु यामुळे पुढील फळांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो व उत्पादन कमी मिळते. फळे झाडावरून देठासहीत काढावीत. साधारणपणे दर ८ दिवसांनी फळांची काढणी करावी. अशा ४ ते ५ काढणीत सर्व पीक निघते. ढोबळ्या मिरचीचे प्रतिहेक्टरी १७ ते २० टनांपर्यंत सरासरी उत्पादन मिळते. ■